1) **Solving Sensational Crime**

2) Kalwan Police Station

3) 21/10/2015 to 14/11/2015

**Brief Facts** :

On 21/10/2015 an unknown dead body of male person was found at Saptashrungi Garh. The deceased was brutally stabbed in stomach and two beer bottles were seen lying near him. On searching the deceased person contact details of his son were found and on contacting the son the deceased was identified as Uttam Dada Chothe, R/o Satpur, Nashik. There were no other clues of the incident. In this connection an offence vide Kalwan PS C.R.no. 92/2015 u/s 302 IPC was registered.

Local Crime Branch team did parallel investigation of the offence. They enquired about the history & past events related to deceased person. Relatives / friends of deceased were interrogated thoroughly. Technical mobile data was analysed. After thorough & continuous investigation offence was detected. It was revealed during investigation that accused persons named 1) Tanaji Kalu Dhatrak, 2) Rahul Dadabhau Dhatrak, 3) Khandu Deoram Bodke and 4) Eknath Baburao Murtadak all R/o Nashik City had planned & committed this crime. All the accused persons were arrested. Weapon & vehicle used in commission of offence has been seized.

# मावसभावाच्या हत्येप्रकरणी काँग्रेस ओबीसी जिल्हाध्यक्ष अटकेत

## सातपूरमधील चोथेंच्या खुनाचा उलगडा, चौघांना बेड्या



**नाशिक :** सुपारी घेऊन खून करणारे चौघे संशयित.

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. १५ : जमिनीच्या पैशाच्या वादातून धारदार हत्याराने वार करून ठार करणाऱ्या चौघांना स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. अटक केलेल्या संशयितांत काँग्रेसच्या ओबीसी सेलच्या जिल्हाध्यक्षाचा समावेश आहे. मृत व्यक्ती त्याचा मावसभाऊ असल्याने इगतपुरी तालुक्यात खळबळ उडाली आहे. जमिनीच्या पैशाच्या वादावरून सुपारी देऊन खून झाल्याचे पोलिस तपासात उघड झाले.

सातपूर येथील उत्तम चोथे यांना जबर मारहाण करून त्यांना ठार करण्यात आल्याची घटना नवरात्रोत्सवात उघडकीस आली होती. वणी (ता. कळवण) भागात नवरात्रात तवेरा घेऊन गेलेल्या चोथे यांची पैशाच्या वादातून धारदार हत्याराने वार करून हत्या



एकनाथ मुर्तडक

करण्यात आली होती. त्यांचा मृतदेह बेवारस सापडला होता. ही घटना उघडकीस आणण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. पोलिस अधीक्षक संजय मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक किशोर नवले, सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास ताटीकोंडलवार, पोलिस उपनिरीक्षक एम. एस. रणमाळे, तसेच सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक अनिल दुमसे, रवींद्र शिलावट यांनी मृताच्या दैनंदिन व्यवहाराची माहिती मिळवत संशयितांचा यशस्वी माग काढला. पोलिसांनी मूळ वादाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत गोपनीय माहिती मिळविली. या खून प्रकरणातील संशयितांनी केलेल्या संपर्कांचा अभ्यास करून कौशल्याने या खुनाचा उलगडा केला. पोलिसांनी मोबाईलवरील संभाषणाचा आढावा घेत याप्रकरणाशी किती व्यक्ती संबंधित आहेत, याचा अभ्यास केला. त्यात चारजण खुनाशी संबंधित असल्याचे पोलिसांनी आढळून आले. पोलिसांनी त्यांच्यावर पाळत ठेवून कारवाईचा फास आवळला. संशयितांत काँग्रेसच्या ओबीसी सेलचा जिल्हाध्यक्ष एकनाथ बाबूराव मुर्तडक (वय ४२, रा. वाडीवऱ्हे) हा मृताचा मावसभाऊ आहे. तानाजी काळू घात्रक (३०, रा. समर्थनगर, पंचवटी), राहुल दादाभाऊ घात्रक (३२, रा. कांतीनगर, हनुमानवाडी), खंडू देवराम बोडके (वय ३७, रा. वाघाडी, पंचवटी) यांना या प्रकरणी अटक केली.